**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**दिनांक २७ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज दिल्लीत मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या**

2. **रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बोलण्याची सक्ती करण्याच्या निर्णयाला मुदतवाढ देण्यास सरकार तयार**

3. **राज्यात आजपासून कृषी केंद्र विक्रेत्यांचा बेमुदत बंद; लवकरच तोडगा निघण्याचा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना विश्वास**

4. **नागपुरात 'छत्रपती शिवाजी महाराज चषक' राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचं येत्या ३० एप्रिल पासून आयोजन**

---

**मुक्त व्यापार करार**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज दिल्लीत मुक्त व्यापार करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. यामुळं दोन्ही देशातला व्यापार दुप्पट होईल, अशी आशा केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज नवी दिल्लीत व्यक्त केली. येत्या पाच वर्षांच्या काळात द्विपक्षीय व्यापार पाच अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचं या कराराचे उद्दिष्ट आहे. वस्त्रोद्योग, प्लास्टिक, चामडं, अभियांत्रिकी क्षेत्रातली भारतीय उत्पादनं आता करमुक्त होतील. यावर आधी सरासरी २ पूर्णांक ३ दशांश टक्के कर होता. येत्या १५ वर्षात न्यूझीलंड भारतात २० अब्ज अमेरिकन डॉलरची गुंतवणूक करणार आहे. या करारांंअंतर्गत ५ हजार भारतीयांना न्यूझीलंडमध्ये रोजगारासाठी तात्पुरता विसा मिळेल आणि ३ वर्षांसाठी राहता येईल. या करारामुळं न्यूझीलंडच्या भारतात निर्यात होणाऱ्या ५४ टक्क्यांहून अधिक वस्तू करमुक्त होतील. त्यात मांस, लोकर, कोळसा आणि इतर वस्तूंचा समावेश आहे. याशिवाय सफरचंद, किवि, मध यासारख्या वस्तूंच्या आयातीवर सवलत मिळेल.

---

**मराठी भाषा बोलणं सक्ती**

राज्यातल्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा बोलणं सक्ती करण्याचा निर्णय पुढे ढकलण्यात आला असून मुदतवाढ देण्याचा निर्णय उद्या घेतला जाईल अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज केली. मुंबईत आज टॅक्सी-रिक्षा चालकांच्या विविध संघटनांसोबत बैठक झाल्यानंतर सरनाईक वार्ताहरांशी बोलत होते. या बैठकीत सर्व संघटनांसोबत सकारात्मक चर्चा झाली. मराठीतून बोलण्याला कुणाचीही हरकत नाही असं सर्व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितलं. मात्र त्यांना काही दिवसांची मुदत हवी आहे, सर्व रिक्षा-टॅक्सी चालकांचे मराठी शिकवणी वर्ग घेतले जातील असं पदाधिकाऱ्यांनी मान्य केल्याचं सरनाईक यांनी सांगितलं. कुणाचाही रोजगार बुडणार नाही याची काळजी सरकार घेईल अशी हमी सरनाईक यांनी दिली.

***(होल्ड बाईट सरनाईक - १९ सेकंद )***

दरम्यान RTO च्या 59 विभाग सोंट उदय बैठक घेतल्यानंतर मुदतवाढ देण्यासंदर्भात निर्णय घेतला जेल अशी माहिती सरनाईक यांनी दिली

---------------------------------------------------------------

**कामगारांची सुरक्षा**

राज्यात वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर उष्णतेची लाट तीव्र होत असून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. याची दखल घेत कामगार कार्यालयाने सर्व आस्थापना मालकांना कामगारांच्या संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना तत्काळ राबविण्याचं आवाहन केलं आहे.गृह मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, हॉटेल्स, खाद्यगृहे, माहिती आणि तंत्रज्ञान कंपन्या, मॉल्स, रिटेल व्यवसाय आदींनी कामगारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावं , असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

---------------------------------------------------------------

**कुपोषण**

आदिवासी बहुल मेळघाट परिसरात कुपोषणाचा प्रश्न अद्यापही गंभीर स्वरूपात कायम असल्याचं समोर आलं आहे. एप्रिल 2025 ते मार्च 2026 या कालावधीत तब्बल 92 बालकांचा मृत्यू झाल्याची नोंद आरोग्य विभागाकडे असून, याच काळात 5 मातांनीही जीव गमावला आहे. चिखलदरा आणि धारणी या डोंगराळ आणि दुर्गम तालुक्यांत हा प्रश्न अधिक गंभीर आहे. दरम्यान आरोग्य सुविधांना चालना देण्याचे प्रयत्न सुरु असून राज्य शासनाने धारणी येथील 100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करून ते 300 खाटांच्या सामान्य रुग्णालयात रूपांतरित करण्यास मान्यता दिली आहे.

---

**बेमुदत बंद**

राज्यात आजपासून कृषी केंद्र विक्रेत्यांनी बेमुदत बंद पुकारला आहे. याचा फटका भंडारा जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांना बसत आहे. रासायनिक खत पुरवठा करणाऱ्या कंपन्यांची खतांबरोबर अन्य अनावश्यक औषधांची सक्ती केली जाते, ती बंद व्हावी या आणि अशा अनेक मागण्या कृषी केंद्र विक्रेत्यांनी केल्या आहेत. या संपामुळे उन्हाळी पिकांसाठी लागणारं साहित्य मिळत नसल्यानं शेतकऱ्यांसमोर प्रश्न उभा राहिला आहे.दरम्यान शासनाने या प्रकरणाची दखल घेतली असून यावर लवकरच यावर तोडगा निघेल, असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात पत्रकारांशी बोलतांना व्यक्त केला. खतांचा काळाबाजार सहन केला जाणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं . तसेच, आमदारांकडून खत दुकानांची तपासणी सुरू असून गैरप्रकार आढळल्यास कठोर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

---

**आप विलीनीकरण**

आपच्या ७ खासदारांचा भाजपामध्ये प्रवेशाचा अर्ज राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी मंजूर केला आहे. त्यामुळं राज्यसभेतल्या भाजपाच्या खासदारांची संख्या ११३ झाली असून आपचे ३ खासदार उरले आहेत.

---

**राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा**

‘छत्रपती शिवाजी महाराज चषक’ राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचं आयोजन नागपुरात येत्या ३० एप्रिल पासून करण्यात येणार आहे अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

***(होल्ड बाईट - बावनकुळे - १५ सेकंद )***

उपसंचालक कार्यालय, क्रीडा आणि युवक सेवा नागपूर विभाग, ॲमॅच्युअर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भ आणि नागपूर ग्रामीण कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातील कबड्डीला चालना मिळेल आणि ग्रामीण खेळाडूंना संधी उपलब्ध होईल, असं बावनकुळे म्हणाले. राज्यातील नामांकित संघ आणि खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

---

**विषबाधा**

मुंबईत एका कुटुंबातल्या चौघांचा अन्नातून विषबाधा होऊन मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये एक जोडपं आणि त्यांच्या दोन अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. या कुटुंबाने दक्षिण मुंबईतल्या आपल्या घरात एका कौटुंबिक सोहळ्याचं आयोजन केलं होतं. तिथे आलेल्या पाहुण्यांसोबत त्यांनी जेवण केलं. पाहुणे निघून गेल्यानंतर या कुटुंबाने कलिंगड खाल्लं होतं. त्यानंतर त्यांना उलट्यांचा त्रास सुरू झाला. या सर्वांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र चौघांचा मृत्यू झाला. कलिंगडामुळे विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

---

**रानटी हत्तींचा उच्छाद**

गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यात धुमाकूळ घातल्यानंतर रानटी हत्तींनी आपला मोर्चा गडचिरोली तालुक्याकडे वळविला असून, उसेगाव आणि राजगाटा परिसरातील पिके उद्ध्वस्त केल्याने शेतकरी धास्तावले आहेत. काल रात्री रानटी हत्तींचा कळप उसेगाव आणि राजगाटा परिसरात आला. त्यातील हत्तींनी धान, मका, आंबा, पपई, ताड इत्यादी पिके आणि फळवृक्षांची नासधूस केली. हत्तींनी १४ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान केले असून, पंचनामे सुरू असल्याचं चातगावचे वनपरिक्षेत्राधिकारी सुनील सोनटक्के यांनी सांगितलं

---

**गोरक्षण कायदा**

गोमातेला ‘राष्ट्रमाता’ असा दर्जा मिळावा आणि गोवंश हत्येवर संपूर्ण बंदी घालण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी यवतमाळात जनआंदोलन करण्यात आलं . दत्त चौकातून निघालेल्या या पदयात्रेत गोरक्षक, गोसेवक, विविध हिंदुत्ववादी संघटना, साधुसंत तसेच गोप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. 'गोसन्मान आवाहन अभियान' अंतर्गत पदयात्रा काढून तहसीलदारांच्या माध्यमातून राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांना उद्देशून निवेदन देण्यात आलं.

---

**हवामान**

विदर्भात उन्हाची तीव्रता कायम असून आज अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यासाठी उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर नागपूर यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यासाठी उष्णतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यादरम्यान चंद्रपूर, यवतमाळ आणि वर्धा जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची देखील शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. उद्या देखील उन्हाची तीव्रता कायम राहणार असून नागपूर, वर्धा, यवतमाळ, चंद्रपूर,

गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता वर्तवण्यात आली आहे दरम्यान आज अमरावती आणि वर्धा जिल्ह्यात ४६ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे. अकोला इथं 46.3 नागपुरात ४४ पूर्णांक ६, आणि चंद्रपुरात ४४ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस इतकं शुष्क तापमान नोंदवण्यात आलं.

**ISSF**

इजिप्तमध्ये कैरो इथे सुरु असलेल्या ISSF ज्युनिअर वर्ल्ड कप २०२६ मध्ये भारतीय नेमबाजांनी सोळा पदकं पटकावली आहेत. यामध्ये पाच सुवर्ण, सहा रौप्य आणि पाच कांस्य पदकांचा समावेश आहे. पन्नास मीटर रायफल थ्री पोझिशन मध्ये हेमंत बर्मनने रौप्य पदकाची कमाई केली तर संमिश्र प्रकारात झुहैर खान आणि आद्या कट्याल यांनी कांस्य पदक जिंकलं .

---

**आयपीएल क्रिकेट**

इंडियन प्रिमियर लिग – आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सामना होणार आहे. दिल्लीतील अरुण जेटली मैदानावर सायंकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरूवात होईल.

---